POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक


○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५३ ● मुंबई, गुरुवार, २४ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA


## एकनाथ शिंदेंना झटका? देवेंद्र फडणवीसांनी सही केल्याशिवाय नगरविकास खात्याच्या 'त्या' फाईल्स पुढे सरकरणार नाहीत

**■मुंबई । प्रतिनिधी,**
राज्यातील महायुती सरकारमधील तिन्ही पक्षांमध्ये अंतर्गत वाद आणि कुरघोडीचे राजकारण चालते, अशा बातम्या सातत्याने ऐकायला मिळतात. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रि पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मित्रपक्षांच्या मनमानी कारभारावर अंकुश लावला होता. स्वतःच्या मर्जीतील ओएसडी आणि पीए हवेत, हा मित्रपक्षांचा हट्ट देवेंद्र फडणवीसांनी पुरवला नव्हता. यावरुनकाहीशी नाराजी असतानाच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याबाबत एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता नगरविकास खात्याच्या मोठ्या रक्कमेच्या निधीवाटपासाठी मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांची मंजुरी बंधनकारक असेल. या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांच्या निवडक पद्धतीने आणि सढळ हस्ते पैसे खर्च करण्याच्या सवयीला अंकुश लावल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. राज्यात येत्या काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने नगरविकास आणि ग्रामविकास ही दोन खाती महत्त्वाची मानली जातात. यापैकी ग्रामविकास खाते हे भाजपकडे आहे. तर प्रचंड उलाढाल होणारे नगरविकास खाते हे एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. नगरविकास


शिंदेंच्या खर्चावर फडणवीसांची बारीक नजर

खात्याच्या माध्यमातून विविध योजनांमार्फत आमदार आणि पालिकेतील नगरसेवकांना निधी पुरवला जातो. मात्र, अलीकडच्या काळात नगरविकास खात्याकडून फक्त शिंदे गटाच्या आमदार, नगरसेवकांना रसद पुरवली जाते. मित्रपक्षाच्या आमदारांना तितकासा निधी मिळत नाही, अशी कुजबुज महायुतीच्यागोटात होती. नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात काही आमदारांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच तक्रार केली होती. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी आता नगरविकास खात्याच्या कारभारात लक्ष घालायचे ठरवले आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून आता नगरविकास खात्याचा निधी सर्व जिल्ह्यांमध्ये समप्रमाणात वाटला जातो की नाही, हेदेखील तपासले जाणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी वेळी शहर भागात नगरविकास खात्याकडून मोठ्या प्रमाणावरनिधीवाटप होण्याची शक्यता आहे. हा निधी महायुतीमधील तिन्ही पक्षांमध्ये योग्यप्रकारेवितरीत होतो की नाही, यावर आता फडणवीसांची नजर असेल. तर नगरविकास खात्याकडून एखादा मोठा निधी वितरीत केला असेल तर त्या निधी वाटपाच्या फाईलला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंजुरी आवश्यक असेल. हा एकप्रकारे एकनाथ शिंदे यांच्या वर एक प्रकारे अंकुश लावण्याचा प्रकार असल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे हा निर्णय एकनाथ शिंदे यांना कितपत रुचणार, त्याच्या काय प्रतिक्रिया उमटणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नगरविकास खात्याच्या ज्या योजना आहेत, त्यामार्फत नगरसेवक आणि आमदारांना मोठा निधी मंजूर करायचा असेल तर एकनाथ शिंदे यांच्या स्वाक्षरीनंतर ती फाईल मुख्यमंत्र्यांकडे जाईल. मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस यांची परवानगी मिळाल्यानंतरच हा निधी वितरीत केला जाईल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी पूर्वी शिंदे गटात मोठ्या प्रमाणावर इनकमिंग होण्याची शक्यता आहे. त्यावेळी एकनाथ शिंदे यांच्याकडून बाहेरुन येणाऱ्या नगरसेवकांना सढळ हस्ते निधीवापट होऊ शकते. या गोष्टीवर महायुतीतील मित्रपक्षांनी आक्षेप घेतला

## कल्याण मारहाण प्रकरणात मोठा ट्विस्ट! रिसेप्शनिस्ट मुलीनेच पहिली लगावली कानशिलात





**■कल्याण । प्रतिनिधी,**
कल्याण पूर्व शहरातील नांदिवली भागात एका खाजगी रुग्णालयात मंगळवारी एक धक्कादायक घटना घडली होती. एका रिसेप्शनिस्ट तरुणीला एका परप्रांतील पुरूषाने बेदम मारहाण केली. ही संपूर्ण घटना रुग्णालयात बसवलेल्या सीसीटीव्हीच्या कॅमेऱ्यात कैद झाली. या व्हिडीओमध्ये गोकुळ झा नावाचा व्यक्ती एका मराठी तरुणीला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत असल्याचे समोर आले होते. याप्रकरणी गोकुळ झा याच्यासह त्याचा मोठा भाऊ रंजीत झा याला पोलिसांनी अटक करुन आज न्यायालयात हजर केलं होतं. न्यायालयाने दोघांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मात्र आता या प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. पीडिता असलेली मराठी रिसेप्शनिस्ट तरुणी सोनाली हिने आधी एका महिलेला कानशिलात लगावली होती, असे एक व्हिडिओ फुटेज सध्या समोर आले आहे. सदर प्रकरणातील नवीन व्हिडीओमध्ये गोकुळ झा, रंजीत झा त्यांची आई आणि सून उभे असल्याचे दिसत आहे. या व्हिडीओमध्ये रिसेप्शनिस्ट तरुणी आणि गोकुळ झा यांच्यात शाब्दिक वाद झाल्याचं पाहायला मिळतंय. यामध्ये गोकुळ झाने तरुणीला पहिली लाथ मारण्याचा प्रयत्न केला. तसेच शिवीगाळही केली. यानंतर गोकुळ झा याला शांत करत त्याच्या आईने त्याला रुग्णालयाच्या बाहेर पाठवले. यानंतर रिसेप्शनिस्ट तरुणीने झा कुटुंबातील एका महिलेला कानाखाली मारलं. त्यानंतर गोकुळ झा बाहेरुन धावत आला आणि रिसेप्शनिस्ट तरुणीला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली.

**गोकुळ झा रेकॉर्ड वरचा गुन्हेगार**

दरम्यान, गोकुळ झा हा रेकॉर्ड वरचा गुन्हेगार आहे. याच्यावर कल्याण कोळशेवाडी उल्हासनगर या परिसरात दरोड्यासह मारहाणीचे गुन्हे दाखल आहेत. कल्याण पूर्व येथील नांदिवली परिसरामध्ये फेरीवाल्याकडून गोकुळ झा हप्ते वसुली करत असल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख निलेश शिंदे यांनी केला आहे. त्यामुळे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार वेगवेगळ्या पद्धतीने त्याची चौकशी करून त्याला कठोर शिक्षा कशी होऊ शकेल यासाठी पोलिसांचा प्रयत्न असणार आहे. सदर घटनेवर गोकुळ आणि रंजीत झा यांची आई म्हणाली की, सदर घटना माज्या समोर घडली असून रिसेप्शनिस्ट तरुणीनेच आधी माज्या सूनेवर हात उचलला. मुलीने माज्या सुनेला शिवीगाळ केली होती. त्यानंतर तरुणीने माज्या सूनेच्या कानाखालीसुद्धा मारली. हा सर्वप्रकार गोकुळ झाने पहिला आणि बाहेरुन धावत येत त्याने तिला लाथ मारली. मात्र त्याने मारहाण करणे योग्य नव्हते, असा स्पष्ट निवाळीही आईने दिला आहे.

## ६ मंत्र्यांचा पत्ता कट होणार

## ठाकरेंनी थेट नावांची यादीच दिली, वाचा कोणकोणत्या नेत्यांचा समावेश?



**■मुंबई । प्रतिनिधी,**
पावसाळी अधिवेशनात 'हनी ट्रॅप'चा मुद्दा चांगलाच गाजला. या प्रकरणात राज्यातील काही अधिकारी आणि नेत्यांचा सहभाग असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. विरोधकांनी हा मुद्दा उचलून धरत सरकारवर चौफेर हल्ला चढवला. नाशिक येथील 'हनी ट्रॅप' प्रकरणात सुमारे ७२ अधिकारी - नेते अडकल्याची माहिती आहे. याच पार्श्वभूमीवर 'सामना'च्या अग्रलेखातून नेमके किती आणि कोणते नेते या प्रकरणात अडकले? किती मंत्र्यांना नारळ देण्यात येणार? याची माहिती देण्यात आली. आजच्या अग्रलेखात केलेल्या दाव्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. ह्याराज्याच्या राजकारणात रंगेल आणि रगेल लोक आली आहेत. एक मंत्री विधानसभेत बसून रमीचा डाव टाकतोय, दुसरा मंत्री लाखो रुपयांच्या नोटांच्या बॅगांचं प्रदर्शन करत सिगारेट फुंकतोय. तिसरा मंत्री आपल्या प्रेयसीच्या हत्येचा आरोप पचवून, अगदी बिनधास्तपणे उपमुख्यमंत्र्यांच्या शेजारी बसतोय. चौथा मंत्री नाशिकच्या चर्चित हनी ट्रॅप प्रकरणातून स्वतःला सोडवण्याची धडपड करतोय, तर पाचवा मंत्री इतरांना अडकवण्याच्या नादात स्वतःच जाळ्यात सापडलाय. रम, रमी, रमणीच्या भानगडीत सरकारचा कोठा झाला आहे, अन कोठ्याच्या हमीदाबाई दिल्लीत बसून सगळ्यांनाच नाचवत आहेह्न, अशा शब्दांत टोकाची टिका आजच्या अग्रलेखातून करण्यात आली आहे. पावसाळी अधिवेशन महायुतीच्या नेत्यांच्या कारनामांमुळे चांगलंच गाजलं. पण या सगळ्यात ठळक ठरणारा मुद्दा म्हणजे हनी ट्रॅप. या ट्रॅपमध्ये बडे नेते मंडळी अडकल्याची माहिती आहे. दरम्यान, मंत्रिमंडळातील पाच ते सहा मंत्र्यांना नारळ देणार असल्याचं बोललं जात आहे. संजय शिरसाट, योगेश कदम, माणिकराव कोकाटे, संजय राठोड, दादा भुसे या मंत्र्यांची नावे चर्चेत आहेत. तसेच हनी ट्रॅपमध्ये अडकलेल्या पाचपैकी काहींना घरचा आहेर देण्यात येणार असल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, गृहमंत्री अमित शहा यांनी याबाबत स्पष्ट सूचना काढल्याचं बोललं जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हनी ट्रॅपबाबत विचारण्यात आले असता, ना हनी ना ट्रॅप असं उत्तर दिलं होतं. हनी ट्रॅप वगैरे असं काही नाही, असं ते म्हणाले होते. मात्र, गुप्तचरांनी दिलेल्या माहितीमुळे सरकारमध्ये हादरे बसण्याची शक्यता अग्रलेखातून वर्तवण्यात आली आहे. मंत्रिमंडळातील साधारण ७० ते ७५ टक्के मंत्र्यांचे आणि आमदारांचे चारित्र्य याच प्रकारचे असून, या सगळ्यांचे नेतृत्व देवेंद्र फडणवीस करत असल्याचा घणाघात या अग्रलेखातून करण्यात आला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील हनी ट्रॅपबाबत मोठा खुलासा केला होता. २०२२ साली हनी ट्रॅपमुळे महाविकास आघाडीचे सरकार पडले असल्याचं वडेट्टीवार म्हणाले होते. त्यामुळे त्यांनी केलेल्या दाव्याला गांभियार्न घ्यावं लागेल, असं यातून स्पष्ट करण्यात आलं आहे.

## पुण्यातील या विधानसभा मतदारसंघात होणार फेरमतमोजणी



### २५ जुलैपासून सुरूवात

हडपसर विधानसभा मतदार संघातून आघाडीचे उमेदवार म्हणून प्रशांत जगताप यांनी निवडणूक लढविली होती. आक्षेप घेतलेल्या उमेदवारांमध्ये त्यांचेही नाव होते. त्यानुसार २५ जुलैपासून हडपसर विधानसभा मतदारसंघातील ज्या २७ मशीन बाबत आक्षेप नोंदवला आहे. त्याची मतमोजणी होणार आहे. त्यानुसार ईव्हीएम मधील मतदान आणि व्हीव्हीपॅट मोजले जाणार आहेत. आठ दिवस ही प्रक्रिया सुरू राहणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या फेरमतमोजणीची सुरुवात हडपसर विधानसभा मतदारसंघातून हळूहळू आक्षेप नोंदविण्यात आलेल्या मतदार संघात होणार आहे.

### ...पण ईव्हीएममुळे ते आपल्यापर्यंत पोहचलं नसल्याचा आरोप

शरद पवार गटाचे माळशिरस विधानसभा मतदार संघाचे आमदार उत्तम जानकर यांनी सर्वप्रथम मरकडवाडी गावात आपल्याला लोकांनी मतदान केलं पण ईव्हीएममुळे ते आपल्यापर्यंत पोहचलं नसल्याचा आरोप केला होता. त्यानंतर राज्यात हा मतदार संघ चर्चेत आला होता. त्यानंतर या गावात बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला होता. यामुळे राज्यात मोठा वादंग निर्माण झाला होता.

**■पुणे । प्रतिनिधी,**
लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं होतं. मात्र, या निवडणुकीत इव्हीएम मशीनवर अनेक प्रश्न उपस्थित करत मतांमध्ये मोठा घोटाळा झाल्याचा आरोप आघाडीच्या नेत्यांनी केला होता. त्यामुळे राज्यातील अनेक ठिकाणच्या मतदारसंघातील आघाडीच्या उमेदवारांनी फेरमतदानाची मागणी केली होती.आता या विषयी एक मोठी अपडेट समोर आली आहे. महाविकास आघाडीच्या १०५ उमेदवारांनी फेर मतमोजणीची मागणी केली होती. या मागणीला निडणूक आयोगाने प्रतिसाद दिला आहे. मूळ मतमोजणी न करता मॉक पोलद्वारे मतदान मोजण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने दिला होता. याविरोधात काही उमेदवारांनी थेट सुप्रिम कोटार्चा दरवाजा ठोठावला होता. त्यानुसार आता ही मागणी मान्य करण्यात आली असून फेर मतदानमोजणी होणार आहे.

## सरन्यायाधीश म्हणाले, ईडीचा राजकीय वापर कसा होतो हे महाराष्ट्रात बघितलं; संजय राऊतांनी 'नरकातला स्वर्ग'च पाठवलं




### ईडीबद्दल काय म्हणाले होते सरन्यायाधीश

म्हैसूर शहरी विकास प्राधिकरण घोटाळ्यातील आरोपी असलेल्या मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी बीएम पार्वती यांना बजावण्यात आलेले समन्स रद्द करण्याच्या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अंमलबजावणी संचालनालयाने (एऊ) दाखल केलेली अपील सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. यावेळी सरन्यायाधीश बीआर गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने म्हटले की, राजकीय लढाया न्यायालयाबाहेर लढल्या पाहिजेत. अशा लढाया लढण्यासाठी ईडीचा वापर का केला जातो, असा प्रश्नही त्यांनी विचारला. मतदारांमध्ये राजकीय लढाई लढू द्या. त्यासाठी तुमचा वापर का केला जात आहे? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली. त्यानंतर, संजय राऊत यांनी हे पुस्तक सरन्यायाधीशांना पाठवले.

### संजय राऊतांचे ट्विट

"भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांना नरकातला स्वर्ग पुस्तकाची प्रत पाठवली. न्या. गवई यांनी ईडीचा राजकीय हत्यार म्हणून वापर होत असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. महाराष्ट्रातील घटनांचा संदर्भ न्या.गवई यांनी दिला. ईडीचे अघोरी उद्योग कसे असतात तेच नरकातला स्वर्गमध्ये मी सांगितले आहे," असे म्हणत संजय राऊत यांनी ट्विट करुन म्हटले.

**■मुंबई । प्रतिनिधी,**
देशात आणि महाराष्ट्रात होत असलेल्या ईडीच्या (एऊ) कारवाईवरुन विरोधक नेहमीच आक्रमक होताना दिसून येतात. कारण, ईडीची कारवाई केवळ विरोधी पक्षांतील नेत्यांवर, आमदार, खासदारांवर आणि उद्योजकांवर होत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जातो. अनेकदा सोशल मीडियातून देखील ईडीच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भाजप सरकारच्या आदेशानेच ईडी काम करत असल्याचे मिम्स आणि जोक्स व्हायरल झाल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळे, ईडीसारख्या संस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यातच, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी देखील ईडीसंदर्भात धक्कादायक वक्तव्य केलं आहे. ईडीचा राजकीय वापर कसा होतो हे महाराष्ट्रात बघितलं, तुमचं राजकारण निवडणुकीत करा अशा शब्दात गवई यांनी सरकारला खडे बोल सुनावले आहेत. त्यातच, आता खासदार संजय राऊत यांनी सरन्यायाधीशांना नरकातील स्वर्ग हे पुस्तक पाठवले आहे.
शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राऊत यांच्यावरही पत्राचाळ घोटाळ्याचे आरोप करत ईडीने गुन्हा दाखल केला होता. 100 दिवस तुरुंगात राहिल्यानंतर त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली. मात्र, राऊत यांना जामीन देताना न्यायालयाने ईडीच्या वकिलांना चांगलंच झापलं होतं. आपल्या 100 दिवसांच्या तुरुंगातील अनुभवावर आधारित संजय राऊत यांनी पुस्तक लिहिलं आहे. आपल्या या पुस्तकाची प्रत संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक नेत्यांना पाठवली आहे, विशेषतः बड्या भाजप नेत्यांनाही त्यांनी हे पुस्तक वाचण्यासाठी भेट दिलं आहे. आता, सरन्यायाधीशांनी ईडीसंदर्भात केलेल्या वक्तव्यानंतर संजय राऊत यांनी थेट सरन्यायाधीशांना त्यांच्या पुस्तकाची प्रत पाठवली आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळमार्फत विविध कर्ज योजनेसाठी अर्ज सादर करावे

**■पालघर । प्रतिनिधी,**
महराष्ट्र राज्यातील अनुसुचित जातीतील मातंग समाज व त्यातील १२ पोट जाती मांग, मातंग, मिनीमादीग, मादोग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गारोडी, मादगी, मादिगा या पोटजातीतील १८ ते ५० या वयोगटातीतील दारिद्ररेषेखालील वार्षिक उत्पन्न मयार्दा तीन लाख (रु. ३०००००) पर्यंत बेरोजगारकरीता, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळमार्फत विविध कर्ज योजना राबविण्यात येतात, या योजनेसाठी पात्र उमेदवारांनीअर्ज सादर करावे असे आवाहन महामंडळाने केले. सन २०२५-२०२६ या वर्षामध्ये खालील प्रमाणे योजनाचे उदिष्ट प्राप्त झालेले आहेत. विशेष केंद्रिय अर्थसहाय्य योजना या मध्ये प्रकल्प मयार्दा ५०,००० पर्यंत कर्ज प्रकरणात रु. १०,०००/- अनुदान देण्यात येते. (या वषार्चे भौतिक उदिष्ट ४० तसेच आर्थिक उदिष्ट २०.०० आहे) .बीजभांडवल योजना प्रकल्प योजना प्रकल्प मयार्दा रु. ५०,०००/- ते ७०००००/- पर्यंतच्या कर्ज प्रकरणात महामंडळ व बँकेच्या संयुक्त निधुतून योजना राबविण्यात येते. (या वषार्चे भौतिक उदिष्ट३० तसेच आर्थिक उदिष्ट २.१० आहे) ३) थेट कर्ज योजना या मध्ये प्रकल्प मयार्दा १०००००/- कर्ज प्रकरणात रुपये १०,०००/- अनुदान निधी तसेच लाभार्थी सहभाग रुपये ५०००/- व महामंडळाचे बिजभांडवल निधी रुपये ८५,०००/- अशा प्रकारे कर्ज मंजूर व नियमा प्रमाणे निधी वितरीत करण्यात येते. (उदिष्ट भौतिक ३० आर्थिक ३०.०० लाख) आहे. या सुविधेचा पालघर जिल्हातील मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीमधील समाजाने शहरीआणि ग्रामिण भागातील इच्छुक व पात्र व्यक्तीने लाभ घ्यावा. कर्ज प्रस्ताव सादर केल्यानतंर महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार मंजूरी संदभार्तील आवश्यक व नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयच्या पुढील पत्त्यावर संपर्क साधावा. जिल्हा व्यवस्थापक ,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) ,अफरिन अपार्टमेंट, ए-विंग.रु.नं. २०३, विक्रीकर कार्यालय शेजारी, नवली रोड, पालघर पिन- ४०१४०४.

# संपादकीय...



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## सनसनाटी राजीनामा

देशाचे उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा दिल्याने दिल्लीतल्या राजकीय वतुर्ळात मोठीच खळबळ निर्माण झालेली पाहायला मिळाली. प्रकृतीच्या कारणावरून आपण राजीनामा देत आहोत असे त्यांनी राष्ट्रपतींना पाठवलेल्या राजीनामापत्रात म्हटले आहे. पण काल राज्यसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाच्या कामकाजात ते सुरुवातीपासून नेहमीप्रमाणे सहभागी झालेले दिसले. राज्यसभा अध्यक्षपदाची अजून बरीच मुदत शिल्लक असताना आजच प्रकृतीच्या कारणावरून तडकाफडकी राजीनामा देण्याइतकी त्यांच्या प्रकृतीची परिस्थिती नाजूक नक्कीच नव्हती. त्यामुळे त्यांनी दिलेले प्रकृतीचे कारण वरकरणी तरी खरे वाटत नाही. त्यामुळे मग या राजीनाम्यावरून अनेक तर्कवितर्क सुरू झाले आहेत. त्यांनी कोणत्यातरी विशिष्ट मुद्द्याच्या नाराजीवरूनच हा तडकाफडकी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला अशा निष्कर्षापर्यंत सगळेच येताना दिसत आहेत. सरकारच्या पातळीवरून मात्र असे काहीच नसल्याचे भासवले गेले असले तरी त्यात तथ्य नाही हेही जाणवत होते. मग दुपारपर्यंत पूर्ण सक्रिय असलेले धनखड अचानक या पदावरून का पायउतार झाले याची कारणमीमांसा प्रसारमाध्यमातील तज्ज्ञांकडून सुरू झाली. त्यात एक कारण असे सांगितले गेले की भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या एका न्यायाधीशाच्या विरोधात विरोधी पक्षाच्या मागणीवरून जो महाभियोग प्रस्ताव सादर केला गेला तो प्रस्ताव धनखड यांनी स्वीकारल्यामुळे सरकारची त्यांच्यावर खप्पा मर्जी झाली, त्यामुळे त्यांनी हा राजीनामा दिल्याचे सांगितले जाऊ लागले. पण या प्रस्तावाला खुद्द सरकारी बाजूचाही पाठिंबा असल्याचे स्पष्ट होऊ लागल्यानंतर आणखी काही कारणे शोधण्याचा प्रयत्न केला गेला. काल सभागृहात भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी अध्यक्षांना उद्देशून जो एक आक्रमक आदेश दिला त्यामुळे धनखड नाराज झाले आणि त्यांनी तातडीने राजीनामा दिला, असे सांगितले गेले आहे. लोकसभेप्रमाणेच राज्यसभेतही पहलगाम आणि ऑपरेशन सिंदूर या विषयावरील चर्चेच्या मागणीसाठी विरोधकांचा गदारोळ सुरू असताना जे. पी. नड्डा अचानक उभे राहिले आणि त्यांनी राज्यसभेच्या अध्यक्षांना उद्देशून सांगितले की, 'आता मी जे काही बोलेल तेवढेच रेकॉर्डवर गेले पाहिजे बाकीचे कोणाचे काहीही रेकॉर्डवर घेतले जाता कामा नये.' एखाद्या केंद्रीय मंत्र्याने सगळ्यांच्या समक्ष थेट राज्यसभेच्या अध्यक्षाला असा आदेश देणे बहुदा धनखड यांना मान्य झाले नसावे आणि त्यांच्या स्वाभिमानाला तडा गेला असावा त्यातूनही तडकाफडकी राजीनाम्याची कृती घडली असावी असाही एक कयास मानला जात आहे आणि त्यात मात्र जरा तथ्य दिसत आहे. सभागृहातील कोणाचा मुद्दा कामकाजाच्या रेकॉर्डवर घ्यायचा किंवा घ्यायचा नाही हा अधिकार सर्वस्वी अध्यक्षांचा असतो. पण काल नड्डा यांनी अध्यक्षांसमोर हातवारे करीत आक्रमकपणे जी सूचना केली ती टीव्हीच्या स्क्रीनवर बघतानाच आक्षेपार्ह वाटत होती. त्यामुळे साहजिकच ती धनखड यांनाही बोचली असणार. तथापि या विषयावर अध्यक्षांची समजूत काढून सहज पडदा टाकता आला असता, यात पंतप्रधानांनी हस्तक्षेप केला असता तर तो विषय त्याच क्षणी मावळला असता. पण सरकारकडूनही त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न झाला नाही, उलट त्यांचा राजीनामाही तडकाफडकी मंजूर केला गेला. सरकारच्या सूचनेवरून हा राजीनामा मंजूर झाल्याची बातमी आल्यानंतर मग पुन्हा या राजीनामा मागे सरकारची काहीतरी सोचीसमझी चाल असावी असेही तर्क लढवले जाऊ लागले. आज सकाळी पंतप्रधान मोदी यांनी या राजीनाम्यावर ट्विटरवर केवळ दोन ओळीत भाष्य केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की 'जगदीप धनखड यांना उपराष्ट्रपती पदापर्यंत विविध महत्त्वाच्या पदावर मिळालेल्या कामाच्या संधीद्वारे देशाची सेवा करता आली आहे. त्यांच्या प्रकृतीला आराम पडावा अशा मी शुभेच्छा देतो.' एवढ्या दोन वाक्यात संदेश देताना मोदींनी बहुदा त्यांना सरकारने तुम्हाला उपराष्ट्रपती पदापर्यंत कामाची संधी दिली याचीही आठवण करून दिली, त्यामुळे मोदींचा हा संदेशसुद्धा वेगळ्या अर्थाने घेतला गेला आहे. नेमके कारण काहीही असले तरी थेट उपराष्ट्रपतींना अचानक राजीनामा द्यावा लागण्यामागे नेमके काय इंगित आहे याची उत्सुकता वाढली आहे. वास्तविक धनखड यांना सरकारकडून जी जी पदे मिळाली त्या प्रत्येक पदावर काम करताना त्यांनी पंतप्रधान मोदी आणि भाजपच्या धोरणानुसारच काम केले आहे, एवढेच नव्हे तर पश्चिम बंगालच्या राज्यपाल पदावर काम करताना त्यांनी तेथील तृणमूल काँग्रेसच्या सरकारला चांगलेच जाम केले होते. त्यामुळे त्यांची राज्यपालपदाची कारकीर्द वादग्रस्त ठरली होती. मात्र, ते आपल्या राजकीय वरिष्ठांचे आदेश पाळताना दिसले. त्यानंतर त्यांची उपराष्ट्रपतिपदी निवड झाली तेव्हापासून आता राजीनामा देईपर्यंतचा त्यांचा कार्यकाळ आणि कामकाजाची पद्धत पाहिल्यानंतर त्यांनी सतत सरकारच्या बाजूनेच पक्षपातीपणा केला आणि विरोधी पक्षाला कायम नियंत्रणात ठेवण्याचा किंवा त्यांचा आवाजच दाबून टाकण्याचा प्रयत्न केला हेही सगळ्यांपुढे स्पष्ट झाले आहे. त्यांच्यावर पक्षपातीपणाचा हा सततचा आरोप होऊनसुद्धा ते जराही बधले नाहीत आणि ते सातत्याने विरोधकांची गळचेपीच करीत राहिले. त्यामुळे विरोधक आणि धनखड यांच्यातील वितुष्टता इतकी वाढली की विरोधकांनी एकत्रितपणे सरळ धनखड यांच्या विरोधात अविश्वासाचा प्रस्तावच दाखल केला होता. विरोधकांकडून अविश्वासाचा प्रस्ताव दाखल झालेले ते देशातले पहिले राज्यसभा अध्यक्ष ठरले होते. सरकारच्या हितासाठी इतकी इमानेइतबारे सेवा करूनही धनखड यांना राजीनामा द्यावा लागल्याने त्यांचे सरकारशी बिनसण्याचे केवळ एक नव्हे तर अन्यही काही कारणे असावीत असे मानायला वाव आहे. धनखड आज 74 वर्षांचे आहेत. या राजीनाम्यानंतर त्यांचे सार्वजनिक जीवन जवळपास संपुष्टात आल्यासारखेच आहे. त्यांच्या कारकिदीर्चा हा असा अचानक शेवट होण्याची वेळ का आली यावर आता खुद्द धनखड यांनाही आत्मचिंतन करावे लागेल. नड्डा यांनी दिलेला अधिकाराबाहेरचा आदेश ऐकून धनखड यांचा आत्मसन्मान दुखावला गेला असेल तर, आपल्या अध्यक्षपदाच्या काळात आपण विरोधकांवर जो पक्षपातीपणा केला त्यातून विरोधी पक्षनेत्यांच्या आत्मसन्मानालाही किती ठेच पोहोचली असेल यावरही त्यांनी निवृत्तीच्या काळात आत्मचिंतन केलेले बरे. या काळात त्यांनी पक्षविरहित राहून लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी आणि संसदीय कार्यपद्धतीची विश्वासार्हता जपण्यासाठी नेमकी काय उपाययोजना भाजप सरकारने करायला हवी याविषयीही आता कसलेही बंधन न बाळगता खुलेपणाने मार्गदर्शन करायला हवे, धनखड यांना निवृत्तीचा काळ आता त्यासाठी सत्कारणी लावता येईल.

## माय लॉर्ड, विश्वास ढळतोय ...!

संसदेचे पावसाळी अधिवेशन विरोधक आणि सत्ताधाऱ्यांच्या आरोप-प्रत्यारोपांत सोमवारी सुरू झाले. पहिल्याच दिवशी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग आणण्याच्या प्रस्तावासाठी दोन्ही बाजूंच्या २०८ हून अधिक खासदारांचे एकमत झाले. महाभियोग म्हणजे काय? तर, वर्मा यांना न्यायमूर्ती पदावरून हटवण्यासाठी संविधानिक प्रक्रिया. देशाच्या न्यायव्यवस्थेला हादरवून टाकणारी घटना चार महिन्यांपूर्वी दिल्लीत घडली. होळीच्या रात्री न्यायमूर्ती वर्मा यांच्या दिल्लीतील सरकारी निवासस्थानी अचानक आग लागली. आगीवर नियंत्रण मिळवताना एका खोलीतून नोटांचे ढीग अग्निशमन दलाला सापडले. एक संपूर्ण खोलीच रोख रकमेने भरली होती. या पैशांची मोजणी आणि तपासणी सुरू झाली. त्यातून मोठा आर्थिक गैरव्यवहाराचा संशय बळावला. आगीत जळालेल्या एकूण नोटांची किंमत होती, पाच, पंधरा की पन्नास कोटी? हा वादाचा मुद्दा असला तरी न्यायमूर्तींच्या अधिकृत निवासस्थानी एवढी मोठी रक्कम कशी सापडली? कोणी दिली? कोणत्या कामासाठी दिली? असे अनेक प्रश्न त्यातून उपस्थित झाले. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक अंतर्गत चौकशी समिती नेमण्यात आली. या समितीने सादर केलेल्या अहवालात, आढळलेली रोख रक्कम ही न्यायमूर्ती वर्मा व त्यांच्या कुटुंबीयांची असून तिचा स्त्रोत त्यांनी स्पष्ट केलेला नाही, हे उघड झाले. त्यामुळेच समितीने त्यांच्यावर महाभियोग चालवण्याची शिफारस केली. मात्र, न्या. वर्मा यांनी न्यायाधीशांविरुद्धच्या तक्रारींमधील अंतर्गत चौकशी प्रक्रियेलाही सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत न्या. वर्मा यांनी भारताचे माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदावरून काढून टाकण्याची केलेली शिफारस असंवैधानिक घोषित करावी अशी विनंती केली होती. दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारने न्या. वर्मा यांना पदावरून हटविण्यासाठी संसदेत महाभियोग प्रस्ताव आणला. त्याला विरोधी पक्षाच्या खासदारांचे पाठबळ मिळाल्याने न्या. वर्मा यांचा पाय अधिक खोलात आहे असे म्हणावे लागेल. वर्मा हे दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती असताना आगीतून 'कॅशकांड' उघड झाले. त्यानंतर त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली झाली. भ्रष्टाचाराचा ठपका माथ्यावर घेऊन त्यांनी न्यायदानाचे काम करावे की नाही, यावरून बराच ऊहापोह झाला. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनने वर्मांच्या नियुक्तीस कडाडून विरोध केला. जो न्यायाधीश दिल्लीत भ्रष्टाचार करतो, तो अलाहाबाद उच्च न्यायालयात करणार नाही याची गॅरंटी कोण देणार?, अलाहाबाद उच्च न्यायालय म्हणजे कचराकुंडी नव्हे, असे बार असोसिएशनचे म्हणणे होते. त्यामुळे न्या. वर्मा यांचे अलाहाबादला परत जाणे बारगळले व त्यांनी स्वतःच रजेवर जाण्याचा निर्णय घेतला. कॅशकांडशी आपला संबंध नसल्याचा दावा करत न्या. वर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. कोणतीही अधिकृत तक्रार नसताना चौकशी सुरू करण्यात आली आहे. अंतिम अहवाल तपासण्यासाठी वेळ न देता मला राजीनामा देण्यासाठी दबाव आणला, सर्वोच्च न्यायालयास शिस्तभंगाचा अधिकार नाही, सरन्यायाधीशांना किंवा सुप्रीम कोटार्ला अन्य न्यायाधीशांवर नियंत्रणाचा घटनात्मक अधिकार नाही, असा युक्तिवाद न्या. वर्मा यांच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात करण्यात आला. मात्र, दुसऱ्या बाजूला न्या. वर्मा यांना पदमुक्त करण्याची प्रक्रिया देशाच्या सर्वोच्च सभागृहात सुरू झाली आहे. त्याचे कारण भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १२४, २१७ आणि २१८ मध्ये न्यायमूर्तींना हटवण्याबाबतची प्रक्रिया सांगितली आहे. महाभियोग प्रस्ताव स्वीकारायचा की नाही, हे पूर्णतः लोकसभेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे सभापती यांच्या निर्णयावर अवलंबून असते. प्रस्ताव स्वीकारल्यानंतर एक उच्चस्तरीय तपास समिती गठीत केली जाते. या समितीत सर्वोच्च न्यायालयाचे आणि उच्च न्यायालयांचे न्यायाधीश असतात. समिती दोन ते तीन महिन्यांत चौकशी करून अहवाल सादर करते. या अहवालात आरोपांना दुजोरा देण्यात आला, तर संसदेत प्रस्ताव मांडण्यात येतो आणि दोन्ही सभागृहांनी दोन-तृतीयांश बहुमताने मंजुरी दिल्यानंतर तो राष्ट्रपतींकडे पाठवला जातो. राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यावर संबंधित न्यायाधीशाला पदावरून हटवले जाते. वर्मा यांना हटविले जाईल की नाही, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. परंतु, न्याय व्यवस्थेला संशयाच्या भोवऱ्यात आणणाऱ्या 'माय लॉर्ड'मुळे जनतेच्या विश्वासाला तडा जाता कामा नये, याची काळजी न्याययंत्रणेत काम करणाऱ्या प्रत्येक जबाबदार व्यक्तीची आहे.

# तपासातले अपयश

कायद्याचे एक मूलभूत तत्त्व आहे, शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एकाही निरपराध्याला शिक्षा होता कामा नये! याच तत्त्वाचे पालन करत २००६ मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटातील बाराही आरोपींची पुराव्याअभावी मुक्तता केली. न्यायालयाने त्याची कारणेही दिली आहेत, त्याचे प्रमुख कारण आहे ते म्हणजे या आरोपींनी बॉम्बस्फोटाचा कट रचला हे सिद्ध करण्यात सरकार पक्ष साफ अपयशी ठरला! न्यायालयाने काही साक्षीदारांच्या साक्षींबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. न्यायालयाने सरकार पक्षावर कडक ताशेरेही ओढले आहेत. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, हे साखळी स्फोट असल्याचे सिद्ध करण्यास सरकार अपयशी ठरला आहे.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि एस. एम. चांडक यांनी हा ऐतिहासिक निकाल देताना काही निरीक्षणे नोंदवली आहेत. ती कायद्याच्या अभ्यासूंनी अभ्यासण्यासारखी आहेत. त्यांनी म्हटले आहे की, ज्या साक्षीदाराने बॉम्ब जुळवताना पाहिले होते, तो १०० दिवस गप्प का राहिला? संशयित आरोपींना तुरुंगात ठेवण्यासाठी जी शेवटची मुदत आहे, तीही सरकार पक्ष पाळू शकला नाही. त्यामुळे, या खटल्यातील अनेक आरोपींनी १८ वर्षे गजाआड काढली आहेत. कोणत्याही न्यायतत्त्वात हे बसत नाही. २००६ च्या जुलैमधील सायंकाळी गर्दीच्या दिवशी १८९ लोक या भीषण बॉम्बस्फोटात ठार झाले, तर ८२७ जण जखमी झाले.

सायंकाळी ऐन गर्दीच्या वेळेस खार, सांताक्रूझ, जोगेश्वरी, माहीम जंक्शन, मीरा रोड, भाईंदर आणि माटुंगा अशा ठिकाणी हे बॉम्बस्फोट झाले. यासाठी कोणत्या प्रकारची स्फोटके वापरण्यात आली हेही सरकार पक्ष सिद्ध करू शकला नाही. सरकार पक्षाच्या म्हणण्यात वैधता सिद्ध झाली नाही. तसेच आरोपींची जी ओळखपरेड झाली, तीही न्यायालयाने नाकारली. ती ओळखपरेड योग्य सक्षम अधिकाऱ्यासमोर झाली नाही, असे न्यायालयाचे म्हणणे आहे. खालच्या न्यायालयात सात जणांना फाशीची शिक्षा ठोठावली होती. पण आता त्या सर्व शिक्षा रद्द झाल्या आहेत.




कोणत्याही खटल्यात ट्रायल कोर्टाच्या फाशीच्या शिक्षेला उच्च न्यायालयाकडून मंजुरी घ्यावी लागते. पण तीच सरकार पक्ष घेण्यात कमी पडला, हे यावरून सिद्ध होते. आता प्रश्न निर्माण होतो, की मग हे बॉम्बस्फोट घडवले कुणी आणि कोणत्या साधनाने? कारण इतके मृत्यू झाले, म्हणजे, कुणीतरी स्फोट घडवले असणारच. पण याच आरोपींनी ते घडवले आहेत, हे सिद्ध करण्यात सरकार पक्ष अपयशी ठरला असा याचा अर्थ आहे. न्यायमूर्ती चौधरी यांनी असा युक्तिवाद केला होता, की काही दिवसांच्या आतच काही आरोपींनी आपला छळ केला जात असल्याचा आणि दबाव आणला जात असल्याचा आरोप केला होता. एका आरोपीचे कोरोना काळात निधनही झाले.

मुंबई उच्च न्यायालयाने वरील निकाल दिल्यानंतर, समोर येईल तो पुरावा ग्राह्य धरता येईल का? असा प्रश्न तपास यंत्रणांसमोर उभा राहिला आहे. मुंबई साखळी स्फोटातील सर्व आरोपीना निर्दोष सोडून दिल्याने आता न्यायदान प्रक्रियेवर आणि पोलिसांच्या तपास पद्धतीवर प्रश्न निर्माण झाले आहेत. पोलीस तपासात अनेक त्रुटी आढळल्या आणि या प्रकरणाची जटिलता पाहता उपलब्ध पुरावे पुरेसे नाहीत असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले आहे. त्यामुळे भारतातील न्यायदान प्रक्रिया आणि पोलीस तपासपद्धती संशयाच्या भोवऱ्यात आली आहे, असे म्हणावे लागेल. या खटल्यात १९२ साक्षीदार असतानाही मुंबई उच्च न्यायालयाने सर्व आरोपींना पुराव्याअभावी सोडून दिले.


याची सर्वांनी आणि विशेषतः कायदेविषयक सेवेतल्या व्यक्तींनी जाणीव करून घ्यायला हवी. साक्षीदारांच्या जबाबात तथ्य आढळले नाही आणि स्फोटात बॉम्ब कोणते वापरले होते, हे सांगण्यात साक्षीदाराना अपयश आले. या खटल्याच्या निकालातून एक सिद्ध होते ती बाब, म्हणजे न्यायमूर्ती पुरावा ठोस असेल तरच ग्राह्य धरतात. कोणताही अभिनिवेश तेथे चालत नाही. जे सत्य असेल, तेच न्यायालय ग्राह्य धरते. १९ वर्षांनंतर आता हा निकाल आला आहे. देशाचा न्यायसंवर्धनेवर विश्वास यामुळे मजबूत होईल का? आरोपींनी कबुलीजबाब द्यावा म्हणून आरोपीचा छळ केला होता, असे आरोपींचे म्हणणे न्यायालयाने ग्राह्य धरले. या सर्व प्रकरणात एटीएसची भूमिका संशयास्पद राहिली. काही वेळा राजकीय पक्ष सरकारवर दबाव आणून आणि न्यायव्यवस्थेवर दबाव टाकून आरोपींची मुक्तता करण्यासाठीही प्रयत्न करतात. इतिहासात पूर्वी असे अनेकदा घडले आहे. काही बाबतीत लोकांना एका विशिष्ट समाजाबद्दल प्रेम किंवा तिरस्कार वाटतो आणि त्यातून न्यायव्यवस्थेवर दबाव वाढत जातो आणि न्यायाधीशही मग लोकांना आवडेल असाच निकाल देतात.

सर्वच न्यायाधीश असे नसतात; पण काहींबाबत चर्चा होते. व्यवस्था शरण न्यायमूर्तींमुळे असे निकाल प्रभावित होता. पण न्यायमूर्ती चांडक आणि न्या. किलोर यांचे कौतुक करायला हवे. त्यांनी कोणत्याही दबावाला किंवा लोकभावनेला बळी न पडता आपला निकाल दिला आणि १२ आरोपींना आरोपमुक्त केले. कोणत्याही न्यायव्यवस्थेने कायद्याच्या चौकटीत राहून आणि पुराव्याच्या आधारे निकाल दिला पाहिजे.न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि कायद्याचे पालन यात महत्त्वाचे आहे. आता प्रश्न उरतोच, की मग बॉम्बस्फोट केले कुणी? त्यासाठी तपास यंत्रणांना आणखी तपास करावा लागेल आणि खरे उत्तर शोधावे लागेल. त्याशिवाय कायदाप्रेमी शांत बसणार नाहीत आणि ज्यांचा जीव गेला, त्यांच्याही आत्म्याला तोपर्यंत शांती मिळणार नाही.

या आरोपींमध्ये खालच्या कोटार्ने दोषी ठरवलेल्या आणि मृत्युदंडाची शिक्षा ठोठावलेल्या पाच जणांचाही समावेश आहे. उच्च न्यायालयाने अविश्वसनीय साक्षीदार आणि दोषपूर्ण खटल्यांचा हवाला दिला आहे. सरकारी वकील संशयापलीकडे खटला सिद्ध करण्यात अपयशी ठरले असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. पण हा निकाल म्हणजे तपासकर्त्यांना एक प्रकारचा धक्का आहे आणि सरकारी पक्षाने किती गलथानपणे या खटल्यात आरोपींना गोवले आहे हे दाखवून देणारा हा निकाल आहे, असे खेदाने म्हणावे लागते. या खटल्याचा निकाल भविष्यातील खटल्यासांठी मार्गदर्शक ठरू शकेल. कारण तपास कसा नसावा आणि सरकारी यंत्रणांनी आपल्या हातातील साधनसामग्रीचा वापर घिसाडघाईने करू नये यासाठी हा खटला आदर्श ठरेल, असे रास्त मत व्यक्त होत आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ आणि आरोपींकडून हस्तगत केलेले साहित्य त्यांचा कबुलीजबाब यावर आधारित खालच्या न्यायालयाने शिक्षा दिली होती. पण ती वरच्या न्यायालयात टिकली नाही. मोक्का न्यायालयाने या आरोपींना फाशीची शिक्षा दिली होती. ती आता रद्द झाली आहे. या प्रकरणात सरकार पक्ष उघडा पडला आहे. त्यामुळे नव्या चचेर्ला सुरुवात झाली आहे आणि अशा खटल्यात शिक्षा झालेल्या आरोपींना सुटकेची आशा निर्माण झाली आहे.

# ‘इतरांपासून अलिप्त राहणं’ एक मानसशास्त्रीय कारण

आपण अनेकदा समाजात, कुटुंबात, घरात बघतो की अगदी छोट्या छोट्या किरकोळ गोष्टी काही लोकं इतरांपासून लपवतात. विनाकारण अत्यंत साध्या, सोप्या विषयाला जटिल बनवून, संभ्रम निर्माण करणे, इतरांना सत्यापासून दूर ठेवणे यामध्ये काहीजण खूप पारंगत असतात. अगदी ते कुठे राहतात, काय करतात, कुठे जातात, कुठे येतात, कोणाला भेटतात हे सुद्धा इतरांना समजू देण त्यांना धोकेदायक वाटतं. काही लोकं जी सतत गोष्टी लपवतात, माहिती इतरांपासून गुप्त ठेवतात, यामागे अनेक मानसशास्त्रीय कारणं असू शकतात, जी त्यांच्या स्वभाव, अनुभव आणि भीतीशी संबंधित असतात. यामागील प्रमुख कारणं आणि त्यावर संभाव्य उपाय काय असू शकतात यावर आपण आज चर्चा करणार आहोत. सतत गोष्टी लपवण्यामागील मानसशास्त्रीय कारण म्हणजे प्रामुख्याने अविश्वासाची भावना, भूतकाळात मिळालेले वाईट अनुभव, धोका किंवा फसवणूक. यामुळे लोकांचा इतरांवरील विश्वास कमी होतो. त्यांना असे वाटते की, जर त्यांनी माहिती उघड केली तर त्याचा गैरवापर होऊ शकतो. यामुळे ते स्वतःला इतरांपासून दूर ठेवतात आणि कोणतीही माहिती देण्यास टाळाटाळ करतात. शक्यतो ज्या लोकांनी काही चुकीचं काम केलेलं असतं किंवा त्यांना कोणीतरी सतत आपल्या मागवर आहे, शोधात आहे अशी भावना असते ती लोकं स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी वैयक्तिक माहिती लपवतात. काही लोकांना त्यांच्या जीवनात आणि आजूबाजूच्या परिस्थितीत पूर्ण नियंत्रण हवे असते. माहिती लपवून ते इतरांना त्यांच्यावर अवलंबून ठेवतात आणि परिस्थितीवर आपले नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात. यामुळे त्यांना सुरक्षित वाटते आणि त्यांची सत्ता टिकून राहते असे त्यांना वाटते. आपले सगळेच बारकावे लोकांना



समजले तर लोक आपला गैरफायदा घेतील, आपल्याला त्रास देण्यासाठी या माहितीचा वापर करतील या भीतीने पण खरी माहिती लपवली जाते. जर त्यांनी काही गोष्टी उघड केल्या तर लोक त्यांना स्वीकारणार नाहीत किंवा त्यांचा तिरस्कार करतील अशी भीती त्यांना वाटते. अनेकदा लोकांकडून कोणत्याही स्वरूपाच्या काही गंभीर, अक्षम्य चुका झालेल्या असतात. या घटना इतरांना समजल्या तर नाव खराब होईल, आपण लोकांच्या नजरेतून उतरू या तणावामुळे सुद्धा माहिती लपवण्याचा कल वाढतो. त्यांना असे वाटते की, त्यांची माहिती उघड झाली तर त्यांच्यावर टीका केली जाईल किंवा त्यांना कमी लेखले जाईल. जर चुकीचं काम, फसवणूक, लबाडी, गुन्हा यांसारख्या घटनांमध्ये कोणीही गुंतलेला असेल तर त्याच्या मनात सातत्याने सामाजिक टीकेची भीती असते, म्हणून हे लोक अलिप्त राहण्यासाठी प्रयत्न करतात. या लोकांना असे वाटू शकते की, लोक त्यांना चुकीचे समजतील किंवा त्यांच्या हेतूबद्दल गैरसमज करून घेतील.

आपण कितीही चांगलं वागू पण आपल्याला वाईट वागणूक मिळाली असेल तर लोक इतरांशी बोलणे टाळतात. जेणेकरून कोणताही गैरसमज नकोच. माहिती उघड केल्याने त्यांना भावनिकरीत्या दुखावले जाईल असे वाटू शकते. या भीतीने ते स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी गोष्टी लपवतात. माहितीमधून आपले कमकुवत मुद्दे, आपल्यातील कमतरता जर इतरांना समजल्या तर हे लोक दुःखी होऊ शकतात म्हणून ते मनमोकळे बोलू शकत नाहीत. ज्या लोकांना स्वतःबद्दल कमी आत्मविश्वास असतो, त्यांना वाटते की ते पुरेसे चांगले नाहीत किंवा त्यांची माहिती महत्त्वाची नाही, यामुळे ते स्वतःला व्यक्त करण्यास कचरतात. यामुळे ते इतरांपासून दूर राहतात आणि त्यांच्या मनातले विचार किंवा भावना व्यक्त करत नाहीत. गोपनीयतेची सवय काहीवेळा फक्त एक सवय असते जी लहानपणापासून विकसित झालेली असते, जिथे त्यांना गोपनीयतेचे महत्त्व शिकवले जाते किंवा ते अशा वातावरणात वाढतात जिथे गोष्टी गुप्त ठेवल्या जातात. त्यांना असे वाटते की गोष्टी लपवणे ही एक सामान्य गोष्ट आहे आणि त्यामुळे काही फरक पडत नाही.

काही लोकांना त्यांच्या भावना किंवा विचार योग्य प्रकारे कसे व्यक्त करावे हेच कळत नाही. त्यांना संवाद साधण्यास किंवा स्वतःला उघड करण्यास त्रास होतो. यामुळे ते गोष्टी लपवून ठेवतात कारण त्यांना वाटते की हे व्यक्त करणे त्यांच्यासाठी खूप कठीण आहे. अनेकदा या लोकांना योग्य पद्धतीने संवाद साधता न आल्यामुळे त्याचे रूपांतर वादात, भांडणात झालेले असते, मनं दुखावली गेलेली असतात. या करणास्तव अशी पुन्हा वृत्ती परत होऊ नये म्हणून बचाव करण्यासाठी हे लोक बोलणं, काही सांगणं बंद करून टाकतात. अशा स्वभावाच्या लोकांमुळे इतरांना मात्र खूप मानसिक त्रास आणि गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. अशा व्यक्तींना मदत करण्यासाठी किंवा त्यांच्याशी योग्य संवाद साधण्यासाठी काही उपाय उपयुक्त ठरू शकतात. सर्वसामान्य लोकांना अनेकदा लपवा-छपवी, खोटं ऐकून त्रास होतो पण ते अशा लोकांसमोर हतबल होतात. आपल्याला जर अशा लोकांमध्ये बदल घडवायचा असेल, त्यांच्या सवई बदलायच्या असतील तर आपण काही उपाययोजना करू शकतो. स्वतःबद्दल अशा व्यक्तींच्या मनात विश्वास निर्माण करा. त्यांच्याशी प्रामाणिक आणि सुसंगत राहा, त्यांना दिलेली वचनं पाळा, शब्द पाळा, त्यांच्या भावनांचा आदर करा आणि त्यांना सुरक्षित वातावरणाची हमी द्या. हळूहळू त्यांचा तुमच्यावरील विश्वास वाढू शकतो. लहान-लहान गोष्टींमध्ये त्यांचा विश्वास संपादन करा, जसे की वेळेवर त्यांच्या मदतीला पोहोचणे किंवा त्यांनी दिलेले काम पूर्ण करणे, त्यांनी काहीही सांगितल्यास ती माहिती आपल्या जवळच गुप्त ठेवणे. संवादाला प्रोत्साहन द्या. त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधा. त्यांना ऐकून घ्या आणि त्यांच्या मतांचा, विचारांचा आदर करा. त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहन द्या. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव टाकू नका. ह्यमला समजून घ्यायचं आहे की तुला काय वाटतं, अशा प्रकारे बोलून त्यांना व्यक्त होण्यास उद्युक्त करा, त्यांना मोकळ बोलता येईल असं वातावरण विश्वासात घेऊन तयार करा.

सकारात्मक वातावरण निर्माण करा. त्यांना असे वाटले पाहिजे की ते तुमच्यासोबत सुरक्षित आहेत आणि त्यांना कोणत्याही प्रकारचा धोका नाही. त्यांची टीका करण्याऐवजी किंवा त्यांना कमी लेखण्याऐवजी, त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा करा. त्यांच्या चांगल्या गुणांवर लक्ष केंद्रित करा आणि त्यांची प्रशंसा करा. तुमच्याबद्दल संशय, शंका मनात येईल असे अजिबात वागू नका. सतत गोष्टी लपवण्याची सवय लगेच बदलत नाही. यासाठी वेळ लागतो आणि खूप संयम लागतो. त्यांना समजून घ्या आणि त्यांच्या बदलाच्या प्रक्रियेला पाठिंबा द्या. त्यांना लगेच उघड होण्यासाठी जबरदस्ती करू नका. त्यांना हळूहळू तुमच्यावर विश्वास ठेवू द्या. जबरदस्तीने कोणतीही माहिती काढून घेण्याचा प्रयत्न करू नका, इतरांकडूनही त्या व्यक्तीबद्दलची माहिती मिळवण्यासाठी धडपड करू नका. जर ही समस्या खूप गंभीर असेल आणि त्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करत असेल, तर त्यांना समुपदेशकाची किंवा मानसशास्त्रज्ञाची मदत घेण्यास प्रोत्साहन द्या.

व्यावसायिक थेरपी त्यांना त्यांच्या भावनांशी सामना करण्यास आणि संवाद कौशल्ये सुधारण्यास मदत करू शकते. त्यांना समुपदेशकाकडे जाण्याचे फायदे समजावून सांगा आणि त्यांना मदत करण्यास तयार असल्याचे दर्शवा. जेव्हा अशी व्यक्ती काही गोष्टी लपवते, तेव्हा तुम्हाला निराशा किंवा राग येऊ शकतो. अशा वेळी स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे. शांत राहा आणि सकारात्मक प्रतिक्रिया द्या. त्यांच्या कृतींचा तुमच्यावर काय परिणाम होतो हे शांतपणे सांगा, पण आरोप करण्याऐवजी तुमच्या भावना व्यक्त करा. समोरील व्यक्ती खोटं बोलत आहे हे जरी तुम्हाला समजत असेल तरी त्याला त्यावरून घालून पाडून बोलू नका. या उपायांमुळे व्यक्तीला सुरक्षित वाटू शकते आणि त्या हळूहळू अधिक मोकळेपणाने संवाद साधू शकतात. महत्त्वाचे म्हणजे, त्यांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचा आदर करणे आणि त्यांना स्वतःच्या गतीने बदलण्याची संधी देणे हे खूप महत्त्वाचे आहे. आपल्या बाजूने आपण जेवढे शक्य तेवढे प्रयत्न नक्कीच करू शकतो.

# सखी

## या एका गोष्टीने केस गळतीवर उपचार करा



केसांच्या अनेक समस्यांवर फिटकरी हा एक नैसर्गिक उपाय म्हणून ओळखला जातो. हा एक पांढरा स्फटिकासारखा पदार्थ आहे जो प्राचीन काळापासून त्वचा आणि केसांच्या काळजीसाठी वापरला जात आहे. केस गळतीच्या समस्येवर मात करण्यासाठी तुरटीचा वापर फायदेशीर ठरू शकतो. तुरटीमध्ये अँटीसेप्टिक, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे टाळू स्वच्छ आणि निरोगी ठेवतात, केसांच्या वाढीस चालना देतात आणि केस गळती नियंत्रित करण्यास मदत करतात. या लेखात, आपण केस गळती रोखण्यासाठी फिटकरीचा योग्य वापर कसा करता येईल ते जाणून घ्या .

१. तुरटी आणि नारळ तेल

केस गळतीची समस्या कमी करण्यासाठी तुरटी आणि खोबरेल तेलाचे मिश्रण उपयुक्त ठरू शकते. नारळाचे तेल केसांची मुळे मजबूत करते आणि तुरटी टाळू स्वच्छ करते, ज्यामुळे केस गळणे कमी होऊ शकते.

कसे वापरायचे:

तुरटीचा एक छोटा तुकडा घ्या आणि त्याची पावडर बनवा.

ही पावडर कोमट खोबरेल तेलात मिसळा.

हे मिश्रण केसांच्या मुळांवर आणि टाळूवर लावा.

हलक्या हातांनी १०-१५ मिनिटे मसाज करा आणि नंतर १ तासानंतर सौम्य शाम्पूने केस धुवा.

आठवड्यातून १-२ वेळा हे पुन्हा करा.

२. तुरटी आणि पाण्याने टाळू स्वच्छ धुवा

केस स्वच्छ करण्यासाठी फिटकरीचे पाणी प्रभावी आहे. हे टाळूवरील अतिरिक्त तेल आणि घाण काढून टाकते आणि केसांची मुळे म जबूत करते. यामुळे केस गळती नियंत्रित होते आणि केस निरोगी राहतात.



कसे वापरायचे:

एक लिटर पाणी उकळवा आणि त्यात तुरटीचा एक छोटा तुकडा घाला.

ते थंड होऊ द्या आणि केस धुतल्यानंतर हे पाणी टाळूवर ओता.

ते काही मिनिटे डोक्यावर राहू द्या आणि नंतर स्वच्छ पाण्याने धुवा.

आठवड्यातून एकदा हा उपाय केल्याने केस गळतीची समस्या कमी होऊ शकते.

३. फिटकरी आणि कोरफडीचे जेल



कोरफड केसांना म ॉइश्चरायझ करते आणि त्यात चमक आणते. तुरटी आणि कोरफडीचे मिश्रण टाळू स्वच्छ करते आणि केसांना मजबूत करते. हे मिश्रण केसांच्या मुळांमध्ये ओलावा टिकवून ठेवते, ज्यामुळे केस गळणे कमी होते.

कसे वापरायचे:

एक चमचा तुरटी पावडर आणि दोन चमचे कोरफडीचे जेल घ्या.

ते चांगले मिसळा आणि टाळूवर लावा.

ते १५-२० मिनिटे टाळूवर राहू द्या आणि नंतर सौम्य शाम्पूने केस धुवा.

हे मिश्रण आठवड्यातून एकदा वापरता येते.

## चारकोल फेसमास्कचे फायदे जाणून घ्या



सध्या चारकोल फेस मास्क खूप लोकप्रिय झाले आहेत, विशेषतः ज्या महिला त्यांची त्वचा खोलवर स्वच्छ करू इच्छितात त्यांच्यामध्ये. कोळशाच्या नैसर्गिक गुणधर्मांमुळे, ते त्वचेतील घाण, अतिरिक्त तेल आणि मृत पेशी काढून टाकण्यासाठी खूप प्रभावी आहे. बाजारात अनेक चारकोल फेस मास्क उपलब्ध आहेत, परंतु ते घरी बनवून तुम्ही नैसर्गिक घटक वापरू शकता, जे त्वचेला हानी पोहोचवणाऱ्या रसायनांपासून मुक्त असतात. घरी चारकोलचा फेस मास्क कसा तयार करता येईल आणि त्याचे फायदे काय आहेत ते जाणून घेऊया.

**चारकोल फेस मास्कचे फायदे**

**१. खोल साफसफाई**

चारकोल मध्ये अशुद्धता बाहेर काढण्याची शक्ती असते, ज्यामुळे ते त्वचेला खोलवर स्वच्छ करते. हे छिद्रे उघडते आणि चेहऱ्यावरील सर्व घाण काढून टाकते.

२. जास्त तेल कमी करते

तेलकट त्वचा असलेल्यांसाठी चारकोल चा फेस मास्क वरदान ठरतो. हे त्वचेतील अतिरिक्त तेल संतुलित करण्यास मदत करते, ज्यामुळे चेहरा ताजा आणि कमी तेलकट वाटतो.

३. मुरुमे कमी करते

चारकोलच्या अँटी-बॅक्टेरियल गुणधर्मामुळे मुरुमे आणि मुरुमे कमी होण्यास मदत होते. हे चेहऱ्यावरील बॅक्टेरिया काढून टाकते, ज्यामुळे मुरुमे कमी होतात.

४. रंग उजळवते

नियमित वापराने, चारकोलचा फेस मास्क त्वचेचा रंग एकसारखा करतो आणि ती चमकवतो. हे मृत त्वचेच्या पेशी काढून टाकते आणि एक चमकदार आणि स्वच्छ पोत देते.

घरी चारकोलचा फेस मास्क कसा बनवायचा?

चारकोल फेस मास्क तयार करण्यासाठी मुख्य घटक म्हणजे सक्रिय चारकोल पावडर. याशिवाय, त्यात इतर नैसर्गिक घटक घालून त्याचे फायदे वाढवता येतात. घरी कोळशाचा फेस मास्क तयार करण्याचे काही सोपे मार्ग येथे आहेत:

चारकोल फेस मास्कसाठी आवश्यक साहित्य:

१ चमचा सक्रिय चारकोल पावडर (औषधांच्या दुकानात किंवा ऑनलाइन उपलब्ध)

१ चमचा बेंटोनाइट क्ले किंवा मुलतानी माती (जास्त घाण काढण्यासाठी)

१ चमचा कोरफड जेल (त्वचेला आराम देण्यासाठी)

२-३ थेंब चहाच्या झाडाचे तेल किंवा लैव्हेंडर तेल (बॅक्टेरियाविरोधी गुणधर्मांसाठी)

पाणी किंवा गुलाबजल (पेस्ट बनवण्यासाठी)

चारकोलचा फेस मास्क कसा बनवायचा:

एका भांड्यात सक्रिय चारकोल पावडर आणि मुलतानी माती (किंवा बेंटोनाइट माती) घाला.

त्यात काही थेंब कोरफडीचे जेल आणि चहाच्या झाडाचे तेल घाला.

आता हळूहळू गुलाबपाणी किंवा पाणी घालून जाडसर पेस्ट बनवा.

पेस्ट नीट मिसळा जेणेकरून गुठळ्या राहणार नाहीत आणि ती गुळगुळीत होईल.

चारकोलचा फेस मास्क कसा वापरायचा?

प्रथम, तुमच्या त्वचेवरील तेल आणि घाण काढून टाकण्यासाठी तुमचा चेहरा धुवा.

आता तयार केलेलीचारकोलची पेस्ट चेहऱ्यावर पातळ आणि समान थरात लावा. ते डोळ्यांभोवती आणि ओठांभोवती लावू नका याची काळजी घ्या.

मास्क १०-१५ मिनिटे सुकू द्या.

मास्क सुकल्यानंतर, कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ करा आणि तो पूर्णपणे पुसून टाका.

यानंतर चेहऱ्यावर मॉइश्चरायझर लावा जेणेकरून त्वचा ओलसर राहील.



## शिफॉन साडी मध्ये सुंदर दिसण्यासाठी टिप्स

शिफॉन साडीचे सौंदर्य कोणत्याही महिलेचे लूक वाढवू शकते. या साड्या त्यांच्या सौंदर्यासाठी, नाजूक कापडासाठी आणि आकर्षक ड्रेसिंगसाठी ओळखल्या जातात. कोणत्याही लग्न, सण किंवा ऑफिसच्या कार्यक्रमासाठी शिफॉन साडी तुमचा लूक आणखी वाढवू शकते. तथापि, शिफॉन साडीची काळजी घेणे तुमच्यासाठी थोडे अवघड असू शकते. जर तुम्ही अजून शिफॉन साडीसोबत हा लूक ट्राय केला नसेल, तर या टिप्स फॉलो करा -

१. शिफॉन साडीचा रंग

साडी शिफॉनची असो किंवा इतर कोणत्याही कापडाची, तुम्हाला अनुकूल असलेला रंग निवडा. जर तुमचा त्वचेचा रंग गडद असेल तर गडद रंग तुमच्यावर छान दिसतील आणि जर तुम्ही गडद रंगाचे असाल तर तुम्ही चमकदार आणि हलक्या रंगाच्या शिफॉन साड्या निवडू शकता.

२. ब्लाउज डिझाइन

शिफॉन साडीसोबत, तुम्ही ब्रोकेड किंवा सिल्क फॅब्रिकपासून बनवलेला डिझायनर ब्लाउज देखील घालू शकता. स्लीव्हलेस व्यतिरिक्त, तुम्ही शिफॉन साडीसोबत ब्रेलेट ब्लाउज देखील कॅरी करू शकता.

३. पल्लूला असे गुंडाळा.

तुम्ही शिफॉन साडीचा पल्लू ओपन फॉल स्टाईलमध्ये कॅरी करू शकता. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही साडीच्या पल्लूला मफलर स्टाईल देखील देऊ शकता. या प्रकारच्या पल्लू शैली कॅरी करायला खूप सोप्या आहेत.

४. कोणत्या प्रकारचे दागिने घालायचे

जर तुम्हाला या साडीत पार्टीवेअर लूक हवा असेल तर साडीसोबत डिझायनर डायमंड आणि रुबी मिक्स ज्वेलरी घालणे हा एक चांगला पर्याय असेल. शिफॉन साडीसोबत डिझायनर केप घालल्याने तुमचा लूक वेगळा दिसतो. यासोबतच, तुम्ही साडीसोबत डिझायनर बेल्ट घालून तिला ट्रेंडी लूक देऊ शकता.

## त्वचेच्या अनेक समस्यांवर पनीरचे पाणी वापरा, जाणून घ्या वापरण्याची पद्धत

जर तुम्हाला तुमची त्वचा नैसर्गिकरित्या निरोगी ठेवायची असेल, तर तुम्हाला नैसर्गिक उत्पादने वापरण्याचा सल्ला दिला जातो. बरं, असे अनेक उपाय आपल्या स्वयंपाकघरात लपलेले आहेत ज्यांची आपल्याला माहितीही नसते.



अशीच एक गोष्ट म्हणजे पनीरचे पाणी, ज्यामध्ये पनीर ठेवले जाते. जेव्हा पनीरचा वापर केला जातो आणि पाण्याला आपण फेकून देतो. पण हे पाणी तुमच्या त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे, ज्याच्या म दतीने त्वचेची नैसर्गिक चमक पुन्हा आणली जाऊ शकते आणि त्वचेशी संबंधित आजार देखील बरे होऊ शकतात. या लेखात आम्ही तुम्हाला पनीरच्या पाण्याचे फायदे आणि त्याचा योग्य वापर कसा करावा याबद्दल सांगणार आहोत.

त्वचेसाठी पनीरच्या पाण्याचे फायदे काय आहेत?

१. नैसर्गिकरित्या चमक वाढवते

रासायनिक उत्पादने वारंवार वापरल्यामुळे जर तुमची त्वचा नैसर्गिक चमक गमावत असेल तर तुम्ही पनीरचे पाणी एकदाच वापरावे. त्वचेची नैसर्गिक चम क वाढवण्यासाठी फक्त नैसर्गिक गोष्टी वापरण्याचा सल्ला दिला जातो आणि पनीरचे पाणी ही त्यापैकी एक आहे.

२. वृद्धत्वाची लक्षणे नियंत्रित करा

आजची वाईट जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या बेफिकीरपणामुळे वृद्धत्वाची लक्षणे लवकर दिसू लागतात. पनीरच्या पाण्यात असलेले विशेष घटक वृद्धत्वाची लक्षणे टाळतात आणि त्वचा दीर्घकाळ तरुण ठेवण्यास मदत करतात.

३. त्वचेचा मुलायमपणा राखतो

जर तुमची त्वचा खूप कोरडी असेल तर त्वचेचा मुलायमपणा टिकवून ठेवण्यासाठी तुम्ही पनीर पाण्याचा वापर करावा.

योग्य पद्धत आणि वापरण्याची वेळ

त्वचेशी संबंधित आजार दूर करण्यासाठी पनीरच्या पाण्याचा योग्य वापर करणे म हत्त्वाचे आहे. पनीरचे पाणी त्वचेसाठी जितके फायदेशीर आहे तितकेच ते वापरण्यासही सोपे आहे. ते लावण्यापूर्वी त्वचा स्वच्छ पाण्याने धुवा आणि सूती कापडाने हलकेच पुसून टाका. आता कापसाच्या तुकड्याच्या मदतीने पनीरचे पाणी त्वचेवर लावा.

पनीरच्या पाण्याचा वापर त्वचेवर केव्हाही केला जाऊ शकतो, परंतु सकाळी उठल्यानंतर लगेच किंवा संध्याकाळी झोपण्यापूर्वी ही सर्वोत्तम वेळ मानली जाते. जर तुम्ही ते रात्री वापरू शकत असाल तर तुम्ही ते तुमच्या त्वचेवर रात्रभर सोडू शकता किंवा २ तासांनंतर त्वचा स्वच्छ पाण्याने धुवा.



## पायांची काळजी घेण्याच्या या टिप्स फॉलो करा

कधी टाचांना भेगा, कधी टॅन, कोरडी त्वचा, कधी घाण... सर्व वयोगटातील महिला पायांच्या या समस्येने त्रस्त आहेत. आपल्या शरीराच्या महत्वाच्या भागांपैकी एक म्हणजे आपले पाय. सर्वप्रथम लोक आपल्या पायांकडे पाहतात. अशा परिस्थितीत, त्यांचे सुंदर आणि सादरीकरण करणे खूप महत्वाचे आहे. या लेखात असे काही उपाय दिले आहेत, ज्यांच्या मदतीने तुम्ही तुमच्या पायांची काळजी घेऊ शकता.

१. मध : मधात उपचारात्मक गुणधर्म देखील आहेत. पहिला फायदा म्हणजे मध टाचांना मॉइश्चरायझ करते आणि त्यांना मऊ देखील करते. जर तुमच्या टाचांवर जखमा असतील तर मध ते लवकर बरे करते.

कसे वापरायचे: एका टबमध्ये कोमट पाणी घ्या आणि त्यात १ टेबलस्पून मध घाला. नंतर तुमच्या टाचांना या पाण्यात ८ते १० मिनिटे बुडवा. नंतर, तुमचे पाय टॉवेल किंवा रुमालाने पुसून टाका. जर तुम्ही या पद्धतीने नियमितपणे तुमच्या टाचांची काळजी घेतली तर ही समस्या लवकर सुटेल.

२. रात्री झोपण्यापूर्वी मालिश करा : तुमचे पाय सुंदर आणि मऊ करण्यासाठी, रात्री झोपण्यापूर्वी तुमचे पाय चांगले धुवा आणि नंतर मॉइश्चरायझिंग क्रीम वापरून काही वेळ पायांची मालिश करा. असे केल्याने माणसाला चांगली झोप तर येतेच पण पायही चमकदार बनवता येतात.

३. प्युमिक स्टोन : बदलत्या हवामानामुळे पायांची त्वचा कधीकधी खडबडीत होते. त्वचेची हरवलेली चमक परत आणण्यासाठी, पायांच्या कडक त्वचेला प्युमिस स्टोनने घासून घ्या. प्युमिक स्टोन मृत त्वचा काढून त्वचेला एक्सफोलिएट करण्याचे काम करतो.

कसे वापरायचे : सर्वप्रथम, तुमचे पाय कोमट पाण्याच्या टबमध्ये बुडवा. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही पाण्यात थोडे बॉडी वॉश घालू शकता. ५ मिनिटांनंतर, गोलाकार हालचालीत प्युमिक स्टोनने पाय घासून घ्या. नंतर मृत त्वचा काढून टाकल्यानंतर पाय कोरडे करा. त्यानंतर कोणतीही क्रीम लावा आणि मोजे घाला जेणेकरून ते पायांसाठी अधिक प्रभावी ठरेल.

४. ग्लिसरीन : ग्लिसरीन त्वचेतील ओलावा अडकवण्याचे काम करते. हिवाळ्यात पाय मऊ, गुळगुळीत आणि भेगा न पडण्यासाठी ग्लिसरीन हा एक सोपा उपाय आहे.

कसे वापरायचे :

दोन झाकण गुलाब पाण्यात चार झाकण ग्लिसरीन मिसळा. हे मिश्रण तुमच्या पायांना चोळा. यानंतर, मोजे घाला आणि झोपा. रात्रभर ठेवल्यानंतर सकाळी कोमट पाण्याने धुवा.



# जळगावमधून १२ हजार कोटींची निर्यात; कृषी आणि अन्न प्रक्रिया क्षेत्राचा मोठा वाटा



**बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

जळगाव - राज्यातून फळांसह भाजीपाला तसेच इतर उत्पादनांच्या निर्यातीला अलिकडच्या काळात चांगली चालना मिळाली आहे. जळगाव जिल्ह्यातही गेल्या चार वर्षांच्या कालखंडात विविध उत्पादनांची निर्यात सुमारे १२ हजार ४०० कोटी रूपयांपर्यंत पोहोचली आहे.ज्यामध्ये कृषी आणि अन्न प्रक्रिया क्षेत्राचा मोठा वाटा राहिला आहे.खुल्या जागतिक व्यापार करारामुळे निर्यातीच्या मोठ्या संधी आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. मात्र, निर्यात होणाऱ्या कृषी व अन्न प्रक्रिया उत्पादनांच्या गुणवत्तेचे निकषही तितकेच कठोर झाले आहेत. निर्यातीसाठीचा शेतीमाल हा पूर्णतः कीड व रोगमुक्त असणे आवश्यक असते.

तसेच त्यामध्ये रासायनिक उर्वरक किंवा कीटकनाशकांचे अंश जागतिक मान्यतेच्या मर्यादेत असणेही तितकेच महत्वाचे मानले जाते. याशिवाय उत्पादनांची साखळी ओळख म्हणजेच शेतकऱ्यांपासून अंतिम ग्राहकापर्यंतच्या प्रवासाची नोंद तसेच वेष्ठण आणि वाहतूक व्यवस्था आंतरराष्ट्रीय मानकांनुसार असावी लागते. या सर्व आव्हानांना तोंड देत जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह अन्न प्रक्रिया उद्योजकांनी गेल्या काही वर्षात निर्यातीत बऱ्यापैकी सातत्य राखले आहे. त्यात उत्तरोत्तर वाढच होताना दिसत आहे. जिल्ह्यातून २०२१-२२ ते २०२४-२५ या चार वर्षांच्या कालखंडात फलोत्पादनासह अन्न प्रक्रिया, प्लास्टिक, औषधी, रबर, ग्लास, पेट्रोलियम, कापड, इलेक्ट्रीकल-इलेक्ट्रॉनिक, लोखंड-स्टील, पादत्राणे उत्पादने आणि रसायनांची सुमारे १२ हजार ४०० कोटी रूपयांची निर्यात विविध देशांमध्ये झाली. त्यात कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांचाच वाटा पाच हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्येही सर्व क्षेत्रातून तीन हजार कोटी रूपयांची निर्यात झाली असताना, त्यात कृषी व अन्न प्रक्रिया उत्पादनांच्या निर्यातीचा वाटा सुमारे १३०२.७५ कोटी रुपए इतका आहे.

जळगाव जिल्ह्याची निर्यात (२०२४-२५)

केळी- १०९.९९ कोटी रुपए
देश- इराण इराक, नेपाळ, ओमान, सौदी अरब, युएई, उझबेकिस्तान, रशिया, स्पेन.

मका (स्टार्च, पीठ, फ्लेक्स, पेंड इ.)- २६८.६२ कोटी रुपए
देश- अंगोला, बांगलादेश, कंबोडिया, बहरीन, इराक, जॉर्डन, कतार, मलेशिया, स्वीडन, हाँगकाँग, इस्त्राएल, जर्मनी, कुवेत, सिंगापूर, यूके, अमेरिका, युएई.

डाळी- ४१७.९० कोटी रुपए
देश- ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, हाँगकाँग, इंडोनेशिया, इटली, फ्रान्स, अफगाणिस्तान, बेल्जियम, अमेरिका, ग्रीस.

# ईडीने सुरू केली मिंत्राची चौकशी, आर्थिक अफरातफरीचा संशय

**बंगळुरू । प्रतिनिधी,**

भारतातील प्रसिद्ध फॅशन ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म मिंत्राची सक्तवसुली संचालनालयाने अर्थात ईडीने (Enforcement Directorate / ED) चौकशी सुरू केली आहे. मिंत्राची परकीय चलन व्यवस्थापन कायदा (फेमा) अंतर्गत चौकशी सुरू आहे. सरकारच्या थेट परकीय गुंतवणुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप मिंत्रावर आहे.मल्टी ब्रँड रिटेल ट्रेडिंग करणाऱ्या मिंत्राने स्वतःला ₹घाऊक रोख आणि कॅरी₹ व्यवसाय म्हणून दाखवले. बंगळुरू येथील ईडीच्या कार्यालयाने मेसर्स मिंत्रा डिझाइन्स प्रायव्हेट लिमिटेड (मिंत्रा) आणि त्यांच्या संबंधित कंपन्या आणि त्यांच्या संचालकांविरुद्ध परकीय चलन व्यवस्थापन कायदा, १९९९ (फेमा) च्या कलम १६(३) अंतर्गत १६५४,३५,०८,९८१/- रुपयांच्या उल्लंघनाचा गुन्हा दाखल केला आहे. मिंत्राने कागदोपत्री त्यांचे बहुतेक सामान मेसर्स वेक्टर ई-कॉमर्स प्रायव्हेट लिमिटेडला विकले आहे. हे व्यवहार कागदोपत्री दाखवून मिंत्रा आर्थिक गैरव्यवहार करत आहे. कायद्यांचे उल्लंघन करत, कर देण्याऐवजी मिंत्रा पैसे फिरवत आहे, असा-ही आरोप ईडीने केला आहे.मिंत्रा २००७ - ०८ दरम्यान भेटवस्तूंच्या विक्रीसाठी सुरू केलेली कंपनी. पुढे २०११ मध्ये त्यांनी फॅशन आणि जीवनशैली उत्पादने विकण्यास सुरुवात केली आणि २०१४ मध्ये फ्लिपकार्टने मिंत्रा खरेदी केले. आता मिंत्रा १००० हून अधिक ब्रँडची १.५ लाखांहून अधिक उत्पादने विकते आणि देशातील ९००० पिन कोडवर डिलिव्हरी करते.

# पत्रकार दत्ता खंदारे यांची यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी निवड !

**मुंबई । प्रतिनिधी,**

तीन दशकांहून अधिक काळ सामाजिक, विधायक कार्यात अग्रेसर राहणारे आणि लेखणीव्दारे वृत्तपत्रांतून समाजातील व्यथा, वेदना, समस्या आजही सातत्याने मांडत रहाणारे जेष्ठ वृतपत्र लेखक, पत्रकार,साप्ताहिक भगवे वादळचे संपादक दत्ता खंदारे यांना सा.आम्ही मुंबईकरचा सांस्कृतिक व साहित्यरत्न तर यशवंतराव चव्हाण फाऊंडेशनचा यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी नुकतीच निवड करण्यात आली आहे. पत्रकार दत्ता खंदारे यांनी गेल्या ३०वर्षाच्या कालावधीत विविध दैनिक, साप्ताहिक आणि मासिका मध्ये सामाजिक प्रश्न मांडून त्या सोडविण्याचा प्रयत्न केला.तसेच प्रसिद्ध झालेली कात्रणे संबंधित खात्याकडे पाठवून संबंधित समस्या सोडवण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा केला. आजपर्यंत पत्रकार दत्ता खंदारे यांना पन्नासहून अधिक



पुरस्कार मिळाले असून यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव पुरस्कार (इंदौर), राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप, साहित्य रत्न लोकसेवा पुरस्कार, महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार, महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार, महाराष्ट्र संपादक भूषण आणि मुंबई वृत्तपत्र लेखक संघटनेचा जागृत नागरिक आणि पत्रभूषण पुरस्कार, हिंदुस्थान 'बुक ऑफ रेकॉर्ड' पुरस्कार आणि नुकतेच त्यांना कार्यदर्पण पुरस्काराने ही गौरवण्यात होते.दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात भारतरत्न डॉ. बी. आर.आंबेडकर राष्ट्रीय सर्वोत्कृष्ट पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. . पत्रकार दत्ता खंदारे यांना भारतीय दलित साहित्य अकादमी (दिल्ली)चा डॉ.आंबेडकर राष्ट्रीय फेलोशिप हि प्राप्त झाला असून पुन्हा एकदा सा.आम्ही मुंबईकरचा सांस्कृतिक व साहित्यरत्न तर यशवंतराव चव्हाण फाऊंडेशनचा यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी दत्ता खंदारे यांची निवड झाल्याने समाजात विविध स्थरातून त्यांच्यावर अभिनंदनासह कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# मराठी तरुणीवर हात उचलणाऱ्या गोकुळला मनसेसैनिकांनी असं पकडलं



**कल्याण। प्रतिनिधी,**

कल्याण येथील एका खाजगी दवाखान्यात काम करणाऱ्या मराठी तरुणीला मारहाण करणारा आरोपी गोकुळ झा याला अखेर अटक करण्यात पोलिसांना यश आलंय. कल्याणच्या मनसैनिकांनी त्याला कल्याणमधील वसार गावातून शेतात पळत जात असताना पकडलं. त्यानंतर त्याला पोलीस स्टेशनला आणण्यात आलं.

कल्याणमधील एका खासगी रुग्णालयामध्ये आरोपी गोकुळ झा हा जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळी रिसेप्शनिस्ट म्हणून काम करणाऱ्या तरुणीने त्याला रोखलं. त्यामुळे या माथेफिरू गोकूळने या मराठी तरुणीला मारहाण केली. केस पकडून तिला मारहाण केली. या घटनेचा व्हिडीओ समोर आल्यानंतर सर्वत्र तीव्र संताप व्यक्त केला जात होता.

दिवसभर गोकुळचा शोध घेतला जात होता. अखेरीस रात्री तो कल्याणमधील वसार गावातून शेतात पळत जात असताना मनसे सैनिकांनी दिसला. त्यानंतर त्याला पकडलं.गाडीत बसवले आणि थेट पोलिस स्टेशन गाठलं.

सोनाली कळासरे या तरुणीला गोकुळ झा याने मारहाण केल्यानंतर मनसेने ठाकरे गटाने आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी केली होती तर आरोपी गोकुळ झा हा चारच दिवसांपूर्वी ट्रक चालकाला मारहाण केल्या प्रकरणी जेल मधून जामिनावरुन सुटून आला होता. गोकुळ वर विठ्ठलवाडी आणि कोळसेवाडी या दोन पोलिस स्टेशनमध्ये मारहाणीचा आणि हत्यार बाळगल्याचा गुन्हा दाखल आहे. या आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांनी पाच टीम बनवल्या होत्या.सकाळी

# दिशा सालियान संदर्भात मातोश्रीबाहेर बॅनर, नेमकं काय घडलं?




**मुंबई । प्रतिनिधी,**

सुशांतसिंह राजपूत यांची मॅनेजर राहिलेली दिशा सालियन मृत्यू प्रकरणामुळे राज्यातील राजकारण ढवळून गेले होते. या संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावर भाजप नेते नारायण राणे आणि नितेश राणे सतत गंभीर आरोप केले होते. एवढंच नाही तर आदित्य ठाकरे यांची नार्को टेस्ट करण्याची मागणीही केली होती. मात्र, पोलीस तपासात दिशा सालियनवर लैंगिक अत्याचाराचे तसेच तिची हत्या केल्याचे पुरावे आढळले नाहीत. त्यामुळे उच्च न्यायालयाने आदित्य ठाकरेंवरील आरोपांना या प्रकरणात क्लिन चिट दिली. आरोप पुसले गेल्यामुळे आदित्य ठाकरे यांच्या प्रतिमेला धक्का लागलेला नाही. त्यानंतर मातोश्रीबाहेर दिशा सालियन हिच्या संदभार्तील बॅनर झळकला आहे. दिशा सालियन हिचा चौदाव्या मजल्यावरून पडून ८ जून २०२० रोजी मृत्यू झाला. तेव्हापासून आदित्य ठाकरेंवर नारायण राणे आणि नितेश राणे वारंवार आरोप करत होते. दिशावर लैंगिक अत्याचार करून पुरावे नष्ट केल्याचा आरोप करण्यात आला होत.

तसेच या प्रकरणात दिशा सालियनच्या वडिलांनी पुन्हा न्यायालयात धाव घेत या प्रकरणाचा नव्याने तपास करण्याची मागणी केली होती. यावरून नितेश राणे यांनी वारंवार आदित्य ठाकरे यांना लक्ष्य केले होते. प्रत्यक्षात न्यायालयाने आदित्य ठाकरेंवर कोणताही ठपका ठेवला नाही. त्यामुळे मातोश्रीबाहेरला हे बॅनर सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या वांद्रेमधील मातोश्री निवासस्थानाबाहेर झळकलेल्या बॅनरवर आदित्य ठाकरेंवर राजकीय आरोपांचे शिंतोडे उठवणाऱ्यांना उच्च न्यायालयाची मोठी चपराक हा आशय आहे. चार-साडेचार वर्षे आदित्य ठाकरेंवर दिशा सालियन हत्येसंदर्भात सतत आरोप केले जात होते. २०२० मधील बिहार विधानसभेच्या निवडणुकीआधी हा मुद्दा तापला होता. त्यात सुशांतसिंह राजपूतची आत्महत्या आणि दिशा सालियनच्या मृत्यूचा उल्लेख असायचा. या सर्व आरोपांना आता पूर्णविराम लागलेले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याणचे जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांनी मातोश्री परिसरात हे बॅनर लावले आहे. दिशा सालियन प्रकरण असल्याने हा बॅनर एकदम चर्चेत आला आहे.

# जे.जे. रुग्णालयाच्या 'फक्त रोख' धोरणामुळे रुग्णांना आर्थिक ताण

**मुंबई । प्रतिनिधी,**


देशभरात डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न सुरू असतानाही, महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या सरकारी रुग्णालयांपैकी एक असलेले भायखळ्याचे सर जे.जे. रुग्णालय प्रामुख्याने रोख-फक्त प्रणालीवर अवलंबून आहे. रोखीवरील हे अवलंबित्व गरजू रुग्णांवर, विशेषतः मर्यादित साधनसंपत्ती असलेल्या किंवा आपत्कालीन परिस्थितीत दाखल झालेल्यांवर, मोठा आर्थिक भार टाकत असल्याचे म्हटले जात आहे. या समस्येवर प्रकाश टाकणारी एक ताजी घटना घडली, जेव्हा एका रुग्णाच्या कुटुंबीयांना १३,००० रुपयांची औषधे बाहेरच्या फार्मसीतून खरेदी करावी लागली. तीच औषधे रुग्णालयाच्या स्वतःच्या दुकानात ९,००० रुपयांना उपलब्ध होती. परंतु, ऑनलाइन पेमेंट पर्यायांच्या अभावामुळे आणि पुरेसे पैसे नसल्यामुळे, कुटुंबाला जास्त खर्च करण्याशिवाय पर्याय नव्हता. गोवंडीतील ती इंग्रजी शाळा तात्काळ बंद करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश, मुलांच्या शिक्षणाचे काय? मुंबईबाहेरून येणाऱ्या कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम सोबत न ठेवता येणाऱ्या अडचणींवर त्यांनी भर दिला. रुग्णालयाच्या फार्मसीमध्ये आवश्यक जेनेरिक औषधांच्या साठ्याबाबत रुग्ण आणि कार्यकर्त्यांनी पुढील चिंता व्यक्त केल्या आहेत. कार्यकर्ते अबू बकर कादरी यांनी आरोप केला की, जेनेरिक फार्मसी वारंवार स्वस्त जेनेरिक औषधांऐवजी ब्रँडेड औषधे जास्त दरात विकते.

डॉक्टर अनेकदा रुग्णालयात उपलब्ध नसलेली औषधे लिहून देतात, ज्यामुळे रुग्णांना ती बाहेरून घ्यावी लागतात, असेही त्यांनी सांगितले.

या वारंवार येणाऱ्या तक्रारींमुळे रुग्णालयाच्या औषधोपचार पद्धतींबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत, जरी रुग्णालय प्रशासन नियमितपणे सरकारी फार्मसी विभागामार्फत औषधे पुरवत असल्याचे सांगते.

एका वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्याने हे प्रकरण सोडवण्याचे आश्वासन दिले आहे, त्यांनी म्हटले आहे की, वैध कारण नसताना रुग्णांना बाहेरची औषधे लिहून दिल्यास विभागप्रमुखांना जबाबदार धरले जाईल. गरजू लोकांची सेवा करण्यासाठी असलेल्या सरकारी रुग्णालयात डिजिटल पेमेंट सोल्यूशन्सचा अभाव आणि कथित हेराफेरीच्या औषधोपचार पद्धती, हे धोरण आणि व्यावहारिक अंमलबजावणी यांच्यातील मोठी तफावत दर्शवते, ज्यामुळे दररोज हजारो रुग्णांवर परिणाम होतो.

# डान्स क्लास लावायचाय, आई-वडिलांचा नकार ; लेकीने थेट हार्पिक प्यायलं, नाशकात अल्पवयीन मुलीचा मृत्यू



**नाशिक,। प्रतिनिधी,**

आई-वडिलांनी डान्स क्लास लावून न दिल्याने रागाच्या भरात एका अल्पवयीन मुलीने विषारी औषध (हार्पिक) पिऊन आपल्या आयुष्याची अखेर केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नाशिकच्या म्हसरूळ परिसरात ही घटना घडली आहे. तिला डान्सचा क्लास लावायचा होता, त्यासाठी ती आई-वडिलांकडे हट्ट करत होती. मात्र, तसं न झाल्याने तिला खूप राग आला आणि तिने रागाच्या भरात हार्पिक प्यायले. २७ एप्रिलला ही घटना घडल्याची माहिती आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेनंतर तिला तातडीने मुंबईच्या के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. पण, उपचारादरम्यान तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी नाशिकच्या म्हसरूळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने या अल्पवयीन मुलीच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे. फक्त डान्स क्लास लावून दिला नाही म्हणून आपली मुलगी असं काही करेल, अशी कल्पनाही तिच्या पालकांनी कधी केली नसेल.

**नाशकात महिला पोलिसाच्या मुलीने आयुष्य संपवलं**

दोन दिवसांपूर्वी नाशकात आणखी एका तरुणीने आपला जीव दिला. पूजा डांबरे नावाच्या २० वर्षीय तरुणीने आपल्या आयुष्याची अखेर केली. तिने नुकतीच बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाली होती. पूजाची आई नाशिक पोलीस दलात अंमलदार म्हणून कार्यरत आहे. जीव देण्यापूर्वी पूजाने एक पत्र लिहिलं होते, ज्यात तिने तिच्या भावना व्यक्त केल्या होत्या. 'आई, तुझी कामामुळे खूप धावपळ होते. तुला त्रास द्यायचा नाही. माझा शैक्षणिक खर्च फार आहे. तू टेन्शन घेऊ नको' असे पूजाने या पत्रात लिहिले होते.

पूजाचे वडील आणि आई विभक्त राहत होते, त्यामुळे ती आईसोबत राहत होती. आईच्या कामाच्या स्वरूपामुळे आणि ड्युटीच्या तासांमुळे पूजाला पुरेसा वेळ मिळत नव्हता, त्यामुळे ती नैराश्यात होती, असं सांगण्यात येत आहे. शिक्षणाचा वाढता खर्च आणि त्यामुळे आईवर येणारा ताण यामुळे तिने हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. ही घटना आडगाव परिसरातील आहे आणि आडगाव पोलीस ठाण्यात या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# पुण्यात क्लास वन अधिकाऱ्याने स्पाय कॅमेऱ्याने पत्नीचे आंघोळीचे व्हिडीओ बनवले, नंतर... किळसवाणं कृत्य

**पुणे । प्रतिनिधी,**

पुण्यात पती-पत्नीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. एका इसमाने आपल्या पत्नीवर पाळत ठेवण्यासाठी घरात स्पाय कॅमेरे लावले. तो एवढ्यावरच थांबला नाही. त्याने घरातच नाही तर घराच्या बाथरुममध्ये देखील स्पाय कॅमेरे लावले. विकृत पतीने आपल्या पत्नीचे आंघोळ करतानाचे व्हिडीओ बनवले आणि त्यानंतर ते व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. हा किळसवाणा प्रकार पुण्यातून समोर आला आहे. विशेष म्हणजे निरक्षर दाम्पत्यामध्ये हा विकृत प्रकार घडला नाही. तर क्लास वन अधिकारी असणाऱ्या पतीने हा प्रताप आपल्या क्लास वन अधिकारी असलेल्या 30 वर्षीय पत्नीसोबत केला आहे. पीडित पत्नीने या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार केली तेव्हा पोलिसांनादेखील धक्का बसला. अर्थात हा प्रकार तसाच धक्कादायक आहे. क्लास वन अधिकारी स्तरावरचा अधिकारी हा संवेदनशील असावा, अशी भावना असते. कारण क्लास वन अधिकारी बनण्यासाठी खूप शिक्षण, खूप मेहनत करावी लागते. या संघर्षात व्यक्ती माणूस म्हणून प्रगल्भ होतो. पण या घटनेतील




क्लास वन असलेल्या व्यक्तीमध्ये बुद्धी आणि संवेदनशीलतेचा अभाव दिसत आहे. त्याने आपल्याच पत्नीचे आक्षेपार्ह व्हिडीओ बनवले आणि पैशांसाठी ते व्हायरल करण्याची धमकी दिली.

या प्रकरणातील पीडित महिलेचं 2020 मध्ये आरोपी पतीसोबत लग्न झालं होतं. आरोपी पती लग्न झाल्यापासून सातत्याने महिलेचा शारीरिक आणि मानसिक छळ करत होता. आरोपी पती आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. त्यातून तो पीडितेला अर्वाच्य शिवीगाळ, मारहाण करायचा. तसेच मानसिक त्रासही द्यायचा. आरोपी पती एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने आपल्या क्लास वन अधिकारी असलेल्या पत्नीवर पाळत ठेवण्यासाठी घरात स्पाय कॅमेरे लावले. तो त्या माध्यमातून पत्नीवर पाळत ठेवायचा. त्याने घरातल्या बाथरुममध्ये देखील स्पाय कॅमेरे बसवले होते. आरोपी पतीने पीडितेचे आंघोळ करतानाचे आणि इतर खाजगी क्षणांचे व्हिडीओ रेकॉर्ड केले होते. त्याने ते व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत माहेरून गाडी आणि घराच्या हफ्त्यासाठी दीड लाख रुपये आणण्याची मागणी केली. अखेर पीडितेने हा सगळा त्रास असह्य झाल्याने अखेर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पीडितेने आंबेगाव पोलीस ठाण्यात तक्रार केली.

पोलिसांनी या घटनेती गंभीरपणे दखल घेतली आहे. या घटनेप्रकरणी पीडितेच्या पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये सासू, सासरे, दीर आणि इतर नातेवाईकांचा समावेश आहे. संबंधित घटना उघडकीस आल्यानंतर एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलीस काय तपास करतात ते पाहणं महत्त्वाचं आहे. पीडित क्लास वन अधिकारी असलेल्या महिलेला न्याय मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# ॲडमिशनवेळीच भरायला पैसे नाहीत, नंतर मिळालेल्या लाभाचं काय करू?



**मुंबई । प्रतिनिधी,**

व्यावसायिक आणि बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण देण्यात येईल, असं महाराष्ट्र सरकारकडून सांगण्यात आलंय. मागील वर्षी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर हा निर्णय घेण्यात आला होता. यात उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषी व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या कोर्सेससह एकूण ५९६ कोर्सेसचा समावेश आहे. तसंच, इतर मागास प्रवर्ग (डइउ), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एहर) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (रएइउ) या विद्यार्थिनींना लाभ मिळेल, असे शासन निर्णय सांगतो. या मोफत शिक्षणाच्या योजनेला ९०६.०५ कोटी इतक्या निधीला मान्यताही दिली गेली होती. मग आम्ही यातले किती खर्च झाले, याचीही माहिती घेतली, तेव्हा लक्षात आलं की, आतापर्यंत, म्हणजे २०२५ या वर्षापर्यंत फक्त ७८.८९ कोटी इतकी रक्कम योजनेसाठी खर्च करण्यात आलीय.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com